# देगलूर महाविद्यालयातील खेळाडूंचे मैदानी स्पर्धेत यश

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर ▪ स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड व एबीएम महाविद्यालय, सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा २० डिसेंबर व २१ डिसेंबर दरम्यान घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये देगलूर महाविद्यालयाचा खेळाडू हेमनर अनिल हा विद्यार्थी १०० मीटर रौप्य व २०० मीटर कांस्य आणि ४१०० रिलेमध्ये व किरण बत्तुलवार ४४०० रिलेमध्ये सुवर्ण व ४१०० रिले रौप्य तसेच मारोती घंटेवाड १०० मीटरमध्ये कांस्यपदक मिळविले आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक डॉ. निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. खेळाडूंच्या यशाबद्दल आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उनग्रतवार, देवेंद्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रविंद्रअप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, डॉ. बी. आर. कत्तुरवार, प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधिक्षक गोविंद जोशी यांनी अभिनंदन केले.